# भारु काकाचा सल्ला

माझ्या लाडक्या हुशार पोरांनो!
आणि
माझ्या प्रिय समजूतदार पालकांनो!

हि पत्रे म्हणजे एकदा वाचून ठेऊन देण्यासाठी नाहीत, तर ती वाचून त्यातील महत्वाच्या वाटणाऱ्या मुद्दयांवरती लगेच कृती करण्यासाठी लिहिण्यात आली आहेत. तसे केले तर त्याचा अभ्यासात तर फायदा होईलच पण त्याने कार्यक्षमता वाढेल, कार्यपद्धती सुधारेल आणि एकुणच विचार करण्याच्या पद्धतीतही आमुलाग्र बदल घडून येईल. यासाठी पुन्हा पुन्हा या पत्रांचं वाचन करायचं आहे.

पालकांनीही यात सहभागी होऊन हि एकुणच योजना जास्तीत जास्त यशस्वी कशी होईल यासाठी प्रयत्नरत रहायला हवं. यासाठी दर महिन्याच्या एका ठराविक तारखेला याचं वाचन-चर्चा केली तर नियमितपणा येईल व सातत्यही राहिल!

मला माहितैय कि हे सर्व नविन आहे. पण काही माणसं त्यांना सोप्या वाटणाऱ्या व आवडणाऱ्या गोष्टी न करता त्यांना न आवडणाऱ्या गोष्टी न करता त्यांना न आवडणाऱ्या पण भविष्याच्या दृष्टिने करणं आवश्यक आहेत अशा गोष्टी करायचं धाडस करतात आणि त्यांनाच आपण यशस्वी माणसं म्हणतो!

मला खात्री आहे, हा तुमचा आमचा सर्वांचा प्रयोग यशस्वी करण्यासाठी तुम्ही सर्व मनापासून व प्रामाणिकपणे प्रयत्न करणार!
तेव्हा बेस्ट ऑफ लक् टू ऑल ऑफ अस्!

**नम्र विनंती**

पत्रांचा हा आगळा-वेगळा उपक्रम व पुस्तकाची मांडणी यासंबंधीचा अभिप्राय जरुर कळवा. त्यामुळे तुमच्या कार्य पद्धतीमध्ये किंवा विचार पद्धतीमध्ये काही सकारात्मक बदल घडले तर अवश्य कळवा. कालांतराने वेळोवेळी येणारे तुमचे अनुभव व जाणवणारे बदल सुद्धा अवश्य कळवा.

तुमच्या भावना, अभिप्राय, सूचना किंवा कोणत्याही मदतीसाठी हाक खालील मार्गांनी माझ्यापर्यंत पोहोचवू शकता!

पत्ता :
पोष्ट बॉक्स् क्र. 274
कल्याण-प, जि. ठाणे - 421301
Mobile No. 08652340256
www.bharukaka.com
E-mail : bharukaka2011@yahoo.com




**ध्येय** दिनांक

**ध्येय** दिनांक

**ध्येय** दिनांक